**माहे जुलै २०२२ महाचा मासिक अहवाल**

**मासिक अहवालामध्ये खालील घटकांनी चांगली कामगिरी केलेली आहे.**

| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| १ | रायगड | ऑस्कर डॉबरमन | १) पोहवा/१४४७ एन.पी.माळवी<br>२) पोहवा/२१३२ एम.बी.निगडे | महाड तालुका पो.स्टे. गु.र.नं. ५१/२०२२ भा.द.वि. कलम २९५ इतर भाग ६ प्रमाणे हा गुन्हा दि.१७/७/२०२२ रोजी १४:४३ वाजता दाखल असून सदर गुन्हयातील घटनास्थळावर आरोपीने हाताळलेल्या मंदीराच्या कुलूपाचा वास श्वान ऑस्कर यास दिला असता श्वान ऑस्कर याने मंदीराबाहेर उपस्थित २० ते २५ जनसमुदायापैकी एका इसमाच्या अंगावर उडया मारून भुंकू लागल्याने सदर इसम नामे संतोष शिवाजी जंगम रा.नागाव जंगमवाडी ता.महाड जि.रायगड यास महाड तालुका पोलीसांनी ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने गुन्हा केल्याचे कबुल केले. |



| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | रत्नागिरी | राणा जर्मन शेफर्ड | १) पोना/४४३ आर.व्ही.वायंगणकर<br>२) पोना/१४५८ एम.ए.कदम | गुहागर पो.स्टे. हद्दीत दि.३/७/२०२२ रोजी मौजे वेळणेश्वर समुद्र किनारी संशयीत बॉम्ब सदृश्य ५ कँडल बॉम्ब सदृश्य सारख्या दिसणा-या वस्तु मिळून आलेल्या होत्या त्या वस्तुंमूळे मानवाच्या व जनावरांच्या जिवीतास धोका उभ्दवण्याची दाट शक्यता असल्याने सदर संशयीत वस्तूंमध्ये स्फोटक पदार्थ आहे किंवा कसे याची खात्री करण्यासाठी श्वान राणा यास सदर वस्तुंचा वास दिला असता त्याने वास घेवुन त्यामध्ये स्फोटक पदार्थ असल्याचा इशारा दिला. HANSSON PYROTECH COMPANY चे IKAROS HAND HELD ROCKET PARACHUTE FLRE हे स्फोटक शोधून ते ओळखण्याकरीता श्वान राणा व त्याचे हस्तकांनी महत्वाची कामगिरी बजावली आहे. |



| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | नवी मुंबई | रूद्रा<br>जर्मन<br>शेफर्ड | १) पोशि/४२२७ एन.एन.जाधव<br>२) पोहवा/१९७३ टी.एम.जाधव | पनवेल तालुका पो.स्टे. गु.र.नं. १६०/२०२२ गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणोर पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८ (सी), २२ (सी), २३ (सी) २९ हा गुन्हा दि.१४/७/२०२२ रोजी सायंकाळी १७:१५ वा. चे पुर्वी घडलेला असुन पनवेल तालुका पो.स्टे. हददीतील आजीवली गाव जुने मुंबई पुणे मार्ग पनवेल येथे एका कंटेनर मध्ये अंमली पदार्थ आहेत अगर कसे ? याची खात्री करण्याकरीता श्वान रूद्रा यास कंटेनरचा वास दिला असता त्याने कंटेनरच्या डाव्या बाजूला वास घेवुन भुंकून इशारा दिला. म्हणुन कंटेनरची तपासणी केली असता कंटेनरमध्ये एकुण ७२.५१८ किग्रॅ वजनाच्या किंमत रू. ३६२,५९,००,०००/- च्या हेरॉईन या अंमली पदार्थाचे एकुण १६८ पॅकेट सापडले होते. |



| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | गोंदीया | लुसी जर्मन शेफडी | १) पोहवा/३९३ व्ही.बी.ठाकरे | रेल्वे प्रोटेक्शन फोर्स गु.र.नं. ६१/२०२२ एनडीपीएस ॲक्ट ८ (सी), २० (बी) हा गुन्हा दि.३/७/२०२२ रोजी १८:०० वाजता दाखल असून रेल्वे स्टेशन गोंदीया येथे शोध घेत असताना प्लॅटफॉर्म नं. ३ येथील गांधी ग्राम एक्सप्रेस कोच नं.२ येथे संशयीत राखाडी रंगाची बॅग मिळून आल्याने श्वान लुसी हीस वास घेण्याचा आदेश दिला असता तिने वास घेतला व भुंकून व बसून इशारा दिला. सदर बॅगेमध्ये ०५.५५४ ग्रॅम कि.ग्रॅ. वजनाचा गांजा मिळून आला. |




अशा प्रकारे माहे जुलै २०२२ मध्ये श्वान पथकामार्फत एनडीपीएस ॲक्ट - २, स्फोटक पदार्थ - १, धार्मीक उपासनास्थानाचे नुकसान करणे - १ असे एकुण - ४ गुन्हे उघडकीस आलेले आहेत.